मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी–चिंचवड » शनिवार, दि. 28 मार्च 2026 | पान- 1

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

# पिंपरी-चिंचवडमधील 'मिसिंग लिंक'चा प्रश्न मार्गी..!

## जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांचे आमदार महेश लांडगे यांना आश्वासन



**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड शहरातील 42 'मिसिंग लिंक'साठी दि. 25 मे पूर्वी भूसंपादनाची कार्यवाही करण्यात येईल. त्यासाठी कालबद्ध नियोजन केले जाईल. त्या अनुशंगाने पिंपरी-चिंचवड महानगरपालिका कार्यवाही करणार आहे, असे आश्वासन जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिले. त्यामुळे 'मिसिंग लिंक' मुळे रखडलेल्या रस्त्यांची कामे मार्गी लागणार आहेत.

भोसरी विधानसभा मतदार संघासह पिंपरी-चिंचवड शहराशी निगडीत विविध मुद्यांवर भाजपा आमदार महेश लांडगे यांनी जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांच्यासोबत पुणे येथील जिल्हाधिकारी कार्यालयात आढावा बैठक घेतली. यामध्ये शहरातील वाहतूक सक्षमीकरणाच्या दृष्टीने 'मिसिंग लिंक', भूसंपादन, डुडुळगाव इको टुरिझम पार्क, महावितरण संबंधित कामांकरीता निधीची उपलब्धता, गायरान जमीन महापालिका हस्तांतरण प्रकरणे आदी मुद्यांवर सकारात्मक चर्चा झाली

नगर रचना विभागाचे उपसंचाक प्रसाद गायकवाड, भूसंपादन विभागाचे समन्वयक कल्याण पांढरे, सहायक नगर रचनाकार उषा विश्वासराव, उपअभियंता कुटे, भूमि अभिलेख विभागाचे अधिकारी आदी उपस्थित होते.

शहरातील 42 'मिसिंग लिंक' साठी दि.25 मे पूर्वी भूसंपादनाची कार्यवाही करण्यात येईल. त्यासाठी कालबद्ध नियोजन केले जाईल. भोसरी मतदार संघात महापालिकेच्या इ-फ-क क्षेत्रीय कार्यालयाअंतर्गत चऱ्होली, दिघी, चिखली या भागातील रस्त्याने विकसित होणारा परिसरामधील जमीन मालक यांचेकडून जागा ताब्यात घेण्याची कार्यवाही तातडीने करण्यात येईल. तसेच, जागा ताब्यात न आल्यास भूसंपादनाचे प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयास प्राप्त झाले असेल, तर त्यावर प्राधान्याने कार्यवाही करावी. त्यासाठी आगामी दोन दिवसांत कामकाज सुरू करावे, असे आदेश भूसंपादन विभागास जिल्हाधिकारी यांनी दिले आहेत.

### गायरान जमीन हस्तांतरणाला गती..

» भोसरी विधानसभा मतदार संघातील मोशी येथे आयआयएम नागपूर या संस्थेला आगाऊ ताबा देणेबाबत जदलगतीने कार्यवाही करण्यात येईल. तसेच, 220/33 केव्ही वीज उपकेंद्र उभारणीसाठी कागदपत्रांची लवकर पूर्तता झाल्यास जागा हस्तांतरणाची प्रक्रिया राबवण्यात येईल. तत्पूर्वी, मनपा प्रशासनाकडून आरक्षण फेरबदल करण्याची प्रक्रिया लवकर करावी, अशी सूचना जिल्हाधिकारी यांनी केली आहे. तसेच, सफारी पार्कबाबत सुधारीत प्रस्ताव मनपा प्रशासनाने जिल्हाधिकारी कार्यालयास तत्काळ प्रस्ताव दाखल करावा, असेही आदेश दिले आहेत.

" शहराची लोकसंख्या ३० लाखांच्या घरात आहे. नागरिकरण आणि औद्योगिकरण मोठ्या प्रमाणात वाढल्यामुळे वाहतूक नियोजन आणि सक्षमीकरणासाठी प्राधान्याने उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शहराचा उल्लेख 'फ्युचर सिटी' म्हणून केला आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली शहरातील एकूण ४२ 'मिसिंग लिंक' चे काम पूर्ण करण्याबाबत पाठपुरावा करीत आहोत. दि. 25 मे पर्यंत रस्त्यांची कामे मार्गी लागतील, असे आश्वासन जिल्हाधिकाऱ्यानी दिले आहे.

- महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी- चिंचवड, पुणे.

# दुचाकीसाठी नोंदणी क्रमांकाची नवीन मालिका सुरु...

## आकर्षक क्रमांकांसाठी 1 व 2 एप्रिलला अर्ज; लिलाव प्रक्रियेद्वारे पसंतीचे नंबर मिळणार




**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड उप प्रादेशिक परिवहन कार्यालय येथे लवकरच दुचाकी वाहनांसाठी 'एनजी' ही नवीन मालिका सुरु करण्यात येत आहे. नव्याने सुरु होणाऱ्या दुचाकी मालिकेतील आकर्षक तसेच पसंतीचे क्रमांक विहित तीनपट शुल्क भरून हवे असतील अशा चारचाकी वाहन मालकांनी १ एप्रिल रोजी सकाळी ११ ते दुपारी २.३० वाजेपर्यंत विहित नमुन्यात अर्ज करावा. दुचाकी मालिकेतील उर्वरित आकर्षक नोंदणी क्रमांक दुचाकी वाहनांसाठी आरक्षित करण्यासाठी २ एप्रिल रोजी सकाळी ११ ते दुपारी २.३० वा. विहित नमुन्यातील अर्ज सादर करावा.

अर्ज कार्यालयाच्या नवीन वाहन नोंदणी विभागात धनाकर्ष (डीडी), पत्त्याचा पुरावा, आधारकार्ड, ओळखपत्र, पॅनकार्डच्या साक्षांकित प्रतीसह आधारकार्डला लिंक असलेल्या मोबाईल क्रमांकासह जमा करावा. हा डीडी 'डी.वाय. आय.टी.ओ., पिंपरी चिंचवड' यांच्या नावे राष्ट्रीयकृत, अनूसचित बँकेचा पुणे येथील असावा. अर्जदाराने ओळख पटविण्यासाठी अर्जासोबत फोटो ओळखपत्र तसेच पत्त्याच्या पुराव्यासाठी आधारकार्ड, दूरध्वनी देयक आदींची साक्षांकित प्रत सादर करणे आवश्यक आहे.

चारचाकी वाहनांसाठी क्रमांकांची यादी २ एप्रिल रोजी सकाळी कार्यालयीन सूचना फलकावर लावण्यात येईल. यादीतील अर्जदारांना लिलावासाठी जास्त रकमेचा डीडी जमा करावयाचा असल्यास २ डिसेंबर रोजी दुपारी २.३० वाजेपर्यंत सीलबंद पाकिटात कार्यालयात जमा करावा. त्याच त्याच दिवशी दुपारी ३.३० वाजता सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी यांच्या कक्षात नोंदणी प्राधिकाऱ्यांच्या उपस्थितीत संबंधीत अर्जदारांसमोर लिफाफे उघडून विनिर्दीष्ट शुल्कापेक्षा जास्तीत जास्त रकमेचा डीडी सादर केला असेल त्या अर्जदारास नमूद पसंती क्रमांक वितरीत केला जाणार आहे.

# चिखली, चऱ्होलीची ‘टीपी स्कीम’ रद्द होणार..!

## भाजपा आमदार महेश लांडगे यांची महत्त्वपूर्ण बैठक; महापालिका आयुक्त शेखर सिंह यांचा सकारात्मक प्रतिसाद

**पिंपरी | प्रतिनिधी**

मौजे चिखली आणि चऱ्होलीत महानगरपालिका प्रशासनाची प्रस्तावित TP SCHEM अखेर रद्द होणार आहे. आयुक्त शेखर सिंह यांनी याबाबत सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. त्यामुळे भूमिपुत्र आणि ग्रामस्थांना दिलासा मिळणार आहे.

चिखली, चऱ्होली येथील प्रस्तावित ‘टीपी स्कीम’ बाबत भाजपा आमदार महेश लांडगे यांनी आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांच्यासोबत महत्त्वपूर्ण बैठक केली. सुमारे तीन तास सुरू असलेल्या बैठकीमध्ये लांडगे यांनी ग्रामस्थ, भूमिपुत्रांची भूमिका ठामपणे मांडली

पिंपरी-चिंचवड शहराच्या स्थापनेपासून 3 ते 4 वेळा आमच्या भूमिपुत्रांच्या जमिनींचे शासनाच्या वतीने भूसंपादन करण्यात आले आहे. 1970 च्या दरम्यान औद्योगिक विकास महामंडळाने उद्योगधंद्यांसाठी भूसंपादन केले, हा पहिला अन्याय झाला. त्यानंतर पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाची स्थापना करुन आमचा विरोध असतानाही जमिनी ताब्यात घेतल्या. टाटा मोटर्स कंपनीच्या विस्तारासाठी पुन्हा आमच्या जमिनींवर भूसंपादनाची कारवाई केली. त्यावेळीही आम्ही आंदोलन उभा केले होते. 1997 मध्ये ग्रामस्थांचा विरोध असताना गावांचा समावेश महापालिका हद्दीत करण्यात आला. प्रत्येकवेळी भूमिपुत्रांवर अन्याय झाला आहे. त्यामुळे या भागात टीपी स्कीम लागू नये, अशी आग्रही भूमिका आमदार लांडगे यांनी आयुक्तांसमोर मांडली..

प्रस्तावित टीपी स्कीमबाबत चिखली आणि चऱ्होली या दोन्ही गावातील ग्रामस्थांमध्ये प्रचंड असंतोष होता. आमदार महेश लांडगे यांनीही सातत्याने टीपी स्कीमला विरोध केलेला आहे. त्यामुळे ‘टीपी स्कीम’ बाबत काय निर्णय होतो? याकडे ग्रामस्थांचे लक्ष लागले होते. दरम्यान महापालिका आयुक्त रजेवर होते. आज आयुक्त महापालिकेत रुजू झाल्यानंतर तात्काळ बैठक घेण्यात आली. त्यामुळे आमदार महेश लांडगे यांच्या मागणीला यश मिळताना दिसत आहे.



### ‘टीपी स्कीम’ रद्द होणार..!

» चिखली आणि चऱ्होली परिसरातील प्रस्तावित टीपी स्कीम रद्द होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. आयुक्त शेखर सिंह यांनी सकारात्मक भूमिका घेतल्याने ग्रामस्थांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. अनेक वर्षांपासून भूमिपुत्रांनी या योजनेला विरोध दर्शवला होता. बैठकीत त्यांच्या भावना आणि अडचणी मांडण्यात आल्या. त्यामुळे प्रशासनाने निर्णयाचा पुनर्विचार करण्याचे संकेत दिले आहेत.

### भूमिपुत्रांचा संघर्ष निर्णायक

» या भागातील जमिनींचे वारंवार भूसंपादन झाल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी होती. आमदार महेश लांडगे यांनी सातत्याने या प्रश्नावर आवाज उठवला. तीन तास चाललेल्या बैठकीत त्यांनी भूमिपुत्रांचा मुद्दा ठामपणे मांडला. या संघर्षामुळे टीपी स्कीम रद्द होण्याची प्रक्रिया वेगाने सुरू झाली असून, स्थानिकांना मोठा दिलासा मिळणार आहे.

“ मौजे चिखली आणि चऱ्होलीत महानगरपालिका प्रशासनाने लादलेली TP Schem रद्द करण्याबाबत आम्ही संघर्षाची तयारी ठेवलेली आहे. आज झालेल्या बैठकीमध्ये आयुक्त शेखर सिंह यांनी सकारात्मक प्रतिसाद देत टीपी स्कीम रद्द होण्याबाबत ‘ग्रीन सिग्नल’ दिलेला आहे. लवकरच याबाबत प्रशासन ‘नोटिफिकेशन’ काढेल असा विश्वास आहे. भूमिपुत्रांवर कोणताही अन्याय होऊ देणार नाही मी कायम त्यांच्या सोबत आहे.

- महेश लांडगे, आमदार, भाजपा,
पिंपरी- चिंचवड, पुणे.

# पीएमआरडीएविरोधात तक्रारींचा पाऊस; दोनशेहून अधिक नागरिकांची धाव प्रशासनाकडे

## पीजी पोर्टलवरील तक्रारींसह बहुसंख्य प्रकरणे निकाली; नागरिकांच्या समस्यांवर जलद कारवाईचा दावा

**पिंपरी | प्रतिनिधी**

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणात गत वर्षभरात 223 तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. त्यापैकी 207 तक्रारींचे निरसन झाल्याचा दावा पीएमआरडीए प्रशासनाने केला आहे. तर, केंद्र शासनाच्या पीजी पोर्टल अर्थात प्रशासकीय आणि लोक सुधारणा या अ‍ॅपवर 64 तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. नागरिकांच्या या तक्रारींचे तातडीने निरसन करण्यात येत असून, त्याचा आढावादेखील घेण्यात येत असल्याचे प्रशासन विभागाने सांगितले.

गेल्या वर्षभरात वेगवेगळ्या विभागाच्या जवळपास 223 तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. त्यामध्ये अतिक्रमण बांधकाम व निर्मूलन विभाग, जमीन व मालमत्ता विभाग तसेच, विकास परवानगी विभागाच्या सर्वाधिक तक्रारी असल्याचे दिसून येते. काही तक्रारी या कार्यालयात प्रत्यक्ष आलेल्या आहेत. तर, केंद्र शासनाच्या पीजी पोर्टल अर्थात प्रशासकीय सुधारणा आणि लोक शिकायत या पोर्टलवर 64 तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. त्यापैकी 54 तक्रारींचे निरसन करण्यात आले आहे.

प्राधिकरणातील वेगवेगळे तब्बल 11 विभाग आहेत. त्यात अतिक्रमण, बांधकाम नियंत्रण व निर्मूलन विभाग, प्रशासन विभाग, विकास परवानगी विभाग, नियोजन विभाग, अभियांत्रिकी 1 आणि 2, अग्निशामन नियंत्रण विभाग, जमीन व मालमत्ता विभाग, वित्त नियंत्रक आणि नियोजन हे महत्त्वाचे विभाग आहेत. प्राधिकरणामध्ये पिंपरी चिंचवड, पुणे आणि ग्रामीण भागाचा मोठा परिसर जोडला आहे. नऊ तालुक्यांचा कारभार आहे. दरम्यान, आकुर्डी आणि औंध या दोन ठिकाणी कार्यालय आहे. परिणामी, वेगवेगळया तालुक्यांतून या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत.

एकाच वेळी कामे होत नसल्याने नागरिकांना नाईलाजाने तक्रारी कराव्या लागत आहेत. त्यातच अतिक्रमण झाल्याबाबत, दस्त अथवा कागदपत्रे न मिळण्याबाबत, बांधकाम परवानगी की अथवा मंजुरी विलंब होण्याबाबतच्या तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत. मात्र, या तक्रारी तातडीने संबंधित विभागाला पाठवून त्याचे निरसन करत असल्याची माहिती प्रशासन विभागाने दिली.




### पीएमआरडीएकडे 223 तक्रारी; 207 निकाली

» पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण येथे गेल्या वर्षभरात 223 तक्रारी प्राप्त झाल्या असून त्यापैकी 207 तक्रारींचे निरसन करण्यात आल्याचा दावा प्रशासनाने केला आहे. केंद्र शासनाच्या पीजी पोर्टलवरील 64 तक्रारींपैकी 54 तक्रारी निकाली काढण्यात आल्या आहेत. अतिक्रमण, बांधकाम परवानगी, जमीन व मालमत्ता या विभागांशी संबंधित तक्रारींचे प्रमाण अधिक आहे. नऊ तालुक्यांचा समावेश असलेल्या कार्यक्षेत्रातून या तक्रारी येत आहेत. नागरिकांच्या तक्रारी तत्काळ संबंधित विभागांकडे पाठवून त्यावर कारवाई केली जात असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले.

# टँकर चालकांना नागरिकांनी पैसे देऊ नये ! पुणे महापालिकेचे आवाहन

## टँकर पाणीपुरवठा मोफत; पैसे मागणाऱ्यांवर दंडाची कारवाई, नागरिकांना तक्रार करण्याचे आवाहन

**पुणे | प्रतिनिधी**

शहरात उन्हाळा वाढल्याने आता पाण्याची मागणी देखील वाढण्यास सुरुवात झाली आहे. शहरातील काही भागात अपुरा आणि कमी दाबाने पाणी पुरवठा होत असल्याने या भागातील नागरिकांची गरज भागवण्यासाठी महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाच्या वतीने अतिरिक्त टँकर दिले जात आहेत. 'शहरातील काही भागांमध्ये महापालिकेच्या वतीने टँकरने पाणीपुरवठा केला जातो.

हा पाणीपुरवठा करताना टँकरचालक तसेच टँकरमालकांनी नागरिकांकडून पैशांची मागणी करू नये. पाण्याच्या टँकरसाठी पैसे मागितल्यास नागरिकांनीदेखील त्यांना पैसे देऊ नयेत,' असे आवाहन महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाकडून करण्यात आले आहे. महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाचे प्रमुख नंदकुमार जगताप यांनी हे आवाहन केले आहे. 'जे टँकरचालक तसेच टँकरमालक नागरिकांकडून पैसे घेतील त्यांना पाच हजार रुपये दंड ठोठावण्यात येईल,' असा इशाराही जगताप यांनी दिला आहे.




### तक्रारींसाठी व्हॉट्सअॅप सुविधा

**» पाणीपुरवठ्याबाबत तक्रारींसाठी महापालिकेने व्हॉट्सअॅप क्रमांक उपलब्ध करून दिला आहे. टँकरचालक पैसे मागत असल्यास नागरिकांनी पुराव्यासह फोटो पाठवावेत. वाढत्या पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाने नागरिकांना सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे.**

पुणे महापालिकेच्या वतीने शहराच्या काही भागांमध्ये टँकरने पाणीपुरवठा करण्यात येतो. महापालिकेच्या वतीने पाणी देण्याची जबाबदारी असलेले टँकरचालक, मालक संधीचा फायदा घेऊन नागरिकांकडे पाण्याच्या टँकरसाठी पैशांची मागणी करतात. काही नागरिक गरजेपोटी पैसेही देतात. मात्र, अनेक ठिकाणी यामधून वाद होतात. या संदर्भात महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाकडे तक्रारी आल्या आहेत

पाणीपुरवठा विभागाचे मुख्य अभियंता नंदकुमार जगताप म्हणाले, 'टँकरचालक अथवा मालकांनी पैशाची मागणी करू नये. नागरिकांनीही त्यांच्या मागणीला प्रतिसाद देऊ नये, असे आवाहन केले आहे. नागरिकांकडे टँकरचालक अथवा मालकांनी पैसे मागितल्यास पाणीपुरवठा विभागाकडे ९६८९९००००२ या व्हॉट्सअॅप क्रमांकावर पुराव्यांसह फोटो पाठवावा.'

### टँकर पाणीपुरवठा मोफत

**» पुण्यात वाढत्या उष्णतेमुळे पाण्याची मागणी वाढली असून काही भागात टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात आहे. महापालिकेने स्पष्ट केले आहे की हा टँकर पाणीपुरवठा पूर्णपणे मोफत आहे. नागरिकांनी कोणत्याही टँकरचालकाला पैसे देऊ नयेत, असे आवाहन करण्यात आले आहे.**

### पैसे मागितल्यास कारवाई

**» टँकरचालक किंवा मालकांनी पाण्यासाठी पैसे मागितल्यास त्यांच्यावर कठोर कारवाई केली जाणार आहे. अशा प्रकरणांमध्ये पाच हजार रुपयांचा दंड ठोठावण्याचा इशारा महापालिकेने दिला आहे. नागरिकांनी अशा प्रकारांना बळी न पडता तक्रार करावी, असेही सांगण्यात आले आहे.**

अधिक माहिती देताना पाणीपुरवठा विभागाचे प्रमुख जगताप यांनी सांगितले की, महापालिकेच्या वतीने दिले जाणारे टँकर हे मोफत असतात. त्यासाठी महापालिका कोणतेही शुल्क घेत नाही. टँकरचालकांनीदेखील नागरिकांकडून शुल्क घेऊ नये. जे टँकरचालक, मालक पाण्याच्या टँकरसाठी नागरिकांकडून बेकायदा पद्धतीने पैसे घेतील त्यांच्यावर पाच हजार रुपयांच्या दंडाची कारवाई केली जाईल.

पुणे महापालिकेच्या हद्दीत नव्याने समाविष्ट करण्यात आलेल्या गावांमध्ये तसेच शहराचे उपनगर अशी ओळख असलेल्या कात्रज, आंबेगाव पठार, कोंढवा, विमान नगर लोहगाव धानोरी बाणेर, धायरी या भागातून विशेषतः पाण्याच्या टँकरची मोठी मागणी होत आहे. गेल्या काही दिवसांपासून उन्हाचा तडाखा वाढत असल्याने पाण्याची मागणी देखील वाढण्यास सुरुवात झाली आहे.

# पुण्यातील भूमिगत मेट्रो परिसरात बांधकामांसाठी आता नवे नियम !

## मेट्रो बोगद्याला धक्का लागल्यानंतर महापालिकेची कडक भूमिका; बांधकामांसाठी नवी नियमावली

**पुणे | प्रतिनिधी**

शहराच्या मध्यवर्ती भागात शुक्रवार पेठेत कूपनलिका खोदताना भूमिगत मेट्रो मार्गामध्ये पाण्याची गळती झाल्याच्या घटनेची महापालिकेने गंभीर दखल घेतली असून, या भागात बांधकाम करण्यासाठी आता नवीन नियमावली करण्याचा विचार केला जात आहे, अशी माहिती महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी दिली. भूमिगत मेट्रो मार्ग परिसरात विशेषतः कूपनलिका खोदताना स्वतंत्र परवानगी घ्यावी लागणार आहे.

मध्यवर्ती भागांतील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी भूमिगत मेट्रो तयार करण्यात आली. मात्र, या ठिकाणी करण्यात येत असलेल्या बांधकाम प्रकल्पांमुळे मेट्रो प्रकल्पासमोरच सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे भूमिगत मेट्रो मार्गांवरील जुन्या इमारती, वाडे यांचा पुनर्विकास करताना आणि नवीन बांधकामे करताना कडक नियम तयार केले जाणार आहेत, असे महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी सांगितले.



शुक्रवार पेठ परिसरात तीन दिवसांपूर्वी खडक पोलीस ठाण्यासमोर एका वाड्यात कूपनलिका घेण्यासाठी खोदकाम केले जात होते. या कामामुळे मेट्रोच्या बोगद्याला भगदाड पडले. त्यामुळे स्वारगेट ते शिवाजीनगर या मार्गावरील मेट्रोच्या बोगद्यात पाणीगळती झाली. ही बाब लक्षात आल्यानंतर मेट्रो प्रशासनाने तातडीने कारवाई करून संबंधित घरमालक आणि ठेकेदाराविरोधात गुन्हा दाखल केला.

### कूपनलिकेसाठी स्वतंत्र परवानगी

**» यापुढे मेट्रो मार्गाजवळ कूपनलिका खोदण्यासाठी स्वतंत्र परवानगी घेणे आवश्यक राहणार आहे. आतापर्यंत एकाच परवानगीत अनेक कामे केली जात होती, मात्र आता प्रत्येक प्रक्रियेसाठी वेगळी मंजुरी घ्यावी लागेल. यामुळे अनधिकृत आणि धोकादायक कामांवर नियंत्रण येणार आहे.**

या घटनेची गंभीर दखल महापालिका प्रशासनाने घेतली असून, मेट्रो मार्गाच्या आजूबाजूला सुरू असलेल्या बांधकाम प्रकल्पांमुळे मेट्रोच्या सेवेत कोणताही अडथळा निर्माण होऊ नये, यासाठी बांधकाम परवानगी देताना विशेष काळजी घेण्याचे नियोजन केले जात आहे. त्यासाठी नवीन नियमावली तयार करण्याचा विचार महापालिकेने सुरू केल्याचे आयुक्त राम यांनी स्पष्ट केले. भूमिगत मेट्रोचा मार्ग जात असलेल्या भागांत बांधकाम करताना वेगळ्या तांत्रिक परवानग्या घ्याव्या लागणार आहेत.

# गॅस टंचाईचा फटका; हॉटेल व्यवसायावर संकटाचे सावट

## आखाती युद्धाचा परिणाम; गॅस पुरवठा खंडित झाल्याने हॉटेल व्यवसाय अडचणीत

**पुणे | प्रतिनिधी**

आखातात भडकलेल्या युद्धामुळे गॅसचा पुरवठा बंद झाल्याने शहरातील बहुतांश हॉटेल आणि रेस्टॉरंटचालकांनी स्वयंपाकासाठी कोळसा, इंडक्शन आणि अन्य इलेक्ट्रीक उपकरणांचा पर्याय स्वीकारला. एरवी दररोज चार सिलिंडर वापरणाऱ्या काही हॉटेलांना आता कोळशाच्या शेगडीवर स्वयंपाक करावा लागत आहे. मात्र, सध्याच्या परिस्थितीत तो अपुरा असून, येत्या काळात परिस्थिती पूर्ववत न झाल्यास शहरातील हॉटेल तसेच रेस्टॉरंट व्यवसाय बंद होण्याची शक्यता व्यावसायिकांकडून वर्तविण्यात येत आहे



### पर्यायी साधनांवर तग धरत व्यवसाय

» गॅसअभावी कोळसा शेगडी, इंडक्शन व इलेक्ट्रिक उपकरणांचा वापर वाढला आहे. मात्र, हायफ्लेम गॅसची गरज असलेल्या पदार्थांची तयारी शक्य नसल्याने मेन्यू मर्यादित करण्यात आला आहे. पंजाबी ग्रेव्हींसारखे पदार्थ बंद करून प्रीपॅकेज पर्याय वापरले जात आहेत, त्यामुळे चव आणि गुणवत्तेवर परिणाम होत आहे.

पूना हॉटेलिअर्स असोसिएशनचे अध्यक्ष श्रीनिवास चाफळकर म्हणाले, व्यावसायिक गॅस सिलिंडरचा पुरवठा बंद झाल्यानंतर बहुतांश हॉटेल आणि रेस्टॉरंटचालकांनी चार ते पाच दिवसांसाठी बंद ठेवले होते. मात्र, त्यानंतर कोळसा शेगडी, इंडक्शन तसेच अन्य इलेक्ट्रीक उपकरणांकडे वळत पुन्हा व्यवसाय सुरू केला. सध्या बहुतांश हॉटेलचालकांनी त्यांच्या मेन्यूकार्डमधील पदार्थ कमी केले आहेत. यामध्ये ज्या खाद्यपदार्थांना जास्त गॅस लागतो ते विशेषत: बंद केले आहेत. गॅसचा तुटवडा असल्याने खाद्यपदार्थ पुरवू शकत नसल्याचे चित्र आहे. यामध्ये हॉटेल तसेच रेस्टॉरंट क्षेत्राला सर्वाधिक फटका बसत आहे.

टपरीचालक, बँक्वेट यापेक्षा हॉटेल, रेस्टॉरंट इंडस्ट्रीमध्ये गॅसची मागणी सर्वात जास्त असते. तर, खाद्यपदार्थांमध्ये पंजाबी खाद्यपदार्थांची फ्रेश ग्रेव्ही तयार करण्यासाठी गॅस लागतो. मात्र, तो नसल्यामुळे सध्या हॉटेलमध्ये प्रीपॅकेज ग्रेव्हीवर काम सुरू आहे. बहुतांश खाद्यपदार्थांना हायफ्लेम गॅस लागतो. परंतु, तो व्यवस्थित नसल्यामुळे त्याचा धंद्यावरही परिणाम झाला आहे. पुरवठादारांकडे शासनाकडून जसा पुरवठा होतो, तसा हॉटेलचालक विकत घेत आहेत. मात्र, बहुतांश ठिकाणी एक ते दोन सिलिंडरवर सर्व कामकाज सुरू आहे. मागणीच्या तुलनेत पुरवठा खूपच कमी आहे. ही परिस्थिती पुढील आठवडाभर लांबल्यास शहरातील रेस्टॉरंट हळूहळू बंद पडू लागतील, असेही चाफळकर यांनी नमूद केले.

हॉटेलमध्येही खाद्यपदार्थ कमी असल्याने त्याचा विक्रीवरही परिणाम झाला असून, ऑनलाइन डिलिव्हरीही कमी प्रमाणात होत आहे. हॉटेल आणि रेस्टॉरंटसाठी व्यावसायिक गॅसच्या मासिक गरजेत 20 टक्के वाढ करण्यात आली आहे. मात्र, प्रत्यक्षात अजून आवश्यक पुरवठा होत नाही.

### गॅस तुटवड्याचा मोठा फटका

» आखातातील युद्धामुळे गॅस पुरवठा विस्कळीत झाल्याने पुण्यातील हॉटेल आणि रेस्टॉरंट व्यवसाय अडचणीत सापडला आहे. अनेक ठिकाणी व्यावसायिक गॅस सिलिंडर उपलब्ध नसल्याने स्वयंपाकासाठी पर्यायी साधनांचा वापर करावा लागत आहे. काही हॉटेलांनी सुरुवातीला व्यवसाय बंद ठेवला होता, तर आता मर्यादित स्वरूपात सेवा सुरू ठेवली आहे.

### व्यवसाय बंद होण्याची भीती

» सध्याच्या परिस्थितीत अनेक हॉटेलांना फक्त एक-दोन सिलिंडरवर काम करावे लागत आहे. मागणीच्या तुलनेत पुरवठा अत्यल्प असल्याने विक्रीत घट झाली आहे. ऑनलाइन डिलिव्हरीही कमी झाली आहे. ही परिस्थिती कायम राहिल्यास येत्या काही दिवसांत हॉटेल आणि रेस्टॉरंट व्यवसाय टप्प्याटप्प्याने बंद पडण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

# बाणेरमध्ये बेशिस्त पार्किंगचा कहर; पादचाऱ्यांचे हाल, वाहतूक पोलिसांवर प्रश्नचिन्ह

## पॅन कार्ड क्लब रोडवर वाहतूक नियमांचा भंग; पादचाऱ्यांचा जीव धोक्यात, प्रशासन मात्र निष्क्रिय

**पुणे | प्रतिनिधी**

बाणेरमधील पॅन कार्ड क्लब रोडवर कायद्याचा अक्षरशः बोजवारा उडाल्याचे धक्कादायक चित्र समोर आले आहे. इलेव्हन वेस्ट या व्यावसायिक इमारतीसमोर दररोज शेकडो दुचाकी आणि चारचाकी वाहने थेट पदपथावर आणि रस्त्यावर उभी केली जात असून, पादचाऱ्यांना अक्षरशः रस्त्याच्या मधोमध जीव धोक्यात घालून चालावे लागत आहे.



### बेशिस्त पार्किंगमुळे नागरिक त्रस्त

» बाणेरमधील पॅन कार्ड क्लब रोडवर बेशिस्त पार्किंगचा प्रश्न गंभीर बनला आहे. इलेव्हन वेस्ट इमारतीसमोर पदपथ आणि रस्त्यावर वाहने उभी केली जात असल्याने पादचाऱ्यांना रस्त्यावरून चालावे लागत आहे. त्यामुळे अपघाताचा धोका वाढला आहे. स्थानिक नागरिकांनी वाहतूक पोलिसांवर दुर्लक्षाचा आरोप केला असून, मोठ्या वाहनांवर कारवाई होत नसल्याबद्दल नाराजी व्यक्त केली आहे. या समस्येमुळे परिसरातील वाहतूक कोंडीही वाढत आहे.

पदपथ हा पादचाऱ्यांसाठी असतो, हा मूलभूत नियमच येथे पायदळी तुडवला जात आहे. दुचाकी वाहने पदपथ गिळंकृत करत आहेत, तर चारचाकी वाहने रस्त्याचा अडथळा बनत आहेत. मात्र, या सर्व प्रकाराकडे बाणेर वाहतूक पोलिसांचे जाणीवपूर्वक दुर्लक्ष होत असल्याचा गंभीर आरोप नागरिकांकडून केला जात आहे.

अधिक धक्कादायक बाब म्हणजे, चौकांमध्ये उभे असलेले वाहतूक पोलीस किरकोळ दुचाकी व चारचाकी वाहनांवर दंडात्मक कारवाई करताना दिसतात; परंतु त्याचवेळी नियमांची पायमल्ली करणारे पाण्याचे टँकर, सिमेंट मिक्सर, तसेच बांधकाम साहित्य वाहून नेणारे ट्रक व ट्रॅक्टर यांना मात्र मोकळे रान दिले जात आहे. पाणी सांडत जाणारे टँकर असोत किंवा रस्ते अडवणारे जड वाहन यांच्यावर कोणतीही कारवाई होत नसल्याने प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

बाणेर परिसरात दिवसेंदिवस वाढत चाललेल्या या बेशिस्त पार्किंग आणि अनियंत्रित वाहतुकीमुळे नागरिक त्रस्त झाले असून, वाहतूक पोलिसांची कार्यक्षमता आणि निष्पक्षतेवरच प्रश्न उपस्थित होत आहेत.

बाणेरमधील पॅन कार्ड क्लब रोडवर कायद्याचा अक्षरशः बोजवारा उडाल्याचे धक्कादायक चित्र समोर आले आहे. संतप्त नागरिकांचा सवाल: "नियम फक्त सामान्य नागरिकांसाठीच आहेत का? मोठ्या वाहनांवर आणि प्रभावशाली घटकांवर कारवाई का होत नाही?" आता तरी प्रशासन जागे होऊन या बेकायदेशीर प्रकारावर तातडीने कठोर कारवाई करणार का, की बाणेरमध्ये असा 'मूक कायदा' च सुरू राहणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.